# प्र क र ण - २ रे.

## संबधित संशोधनाचा अभ्यास व संशोधनाची कार्यपध्दती

# प्रकरण - २ रे - संबंधित संशोधनाचा अभ्यास व संशोधनाची कार्यपद्धती.

२.१ प्रस्तावना.

२.२ संबंधित संशोधनाचा अभ्यास.

२.३ संशोधनाची कार्यपद्धती.

----------

# प्रकरण २ रे.

## संबंधित संशोधनाचा अभ्यास व संशोधनाची कार्यपध्दती.

### २.१ प्रस्तावना -

मागील प्रकरणात संशोधनाचा विषय, संशोधनाचे महत्व, उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती, व मर्यादा या बाबी दिल्या आहेत. प्रस्तुत संशोधनासारखे जे संशोधन झालेले आहेत. अशा काही संशोधनाची माहिती अभ्यासकाने या प्रकरणात दिली आहे. संशोधनाची पध्दती, संशोधनाची साधने व कार्यपध्दती याबद्दलची माहिती या प्रकरणात दिलेली आहे.

### २.२ संबंधित संशोधनाचा अभ्यास -

एखादा व्यक्तीच्या विचाराचा, शिक्षणाची ध्येये, उद्दिष्टे, अध्यापन पध्दती व अभ्यासक्रम या गोष्टीवर परिणाम झालेला दिसून येतो. रुसोने व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. तर जॉन डयूई म्हणतात.

> " मुलाच्या शिक्षणाचा प्रारंभ मानसशास्त्रीय दृष्टीकोनातूनच झाला पाहिजे. म्हणजे मुलाच्या जन्मजात शक्ती, आवडी-निवडी वृत्ती-प्रवृत्ती विचारात घेतल्या पाहिजेत. परंतु हळू हळू या शक्तींचा विकास होत असतानाच त्यांना सामाजिक परिमाण प्राप्त करु द्यावे व आपल्या शक्तींचा उपयोग समाज कार्यासाठी कसा करुन घ्यावा याची जाणीव करुन द्यावी "[१].

महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, शंकराचार्य,

कर्मवीर भाऊराव पाटील, छत्रपती शाहू महाराज व महाराज सयाजीराव गायकवाड या व्यक्तींच्या विचारांचा शिक्षणावर कोणता परिणाम झालेला आहे याबाबतचे संशोधन झालेले आहे. त्यातील काही संशोधनाची माहिती अभ्यासकाने येथे दिलेली आहे.

अ] डॉ. भट्ट जे. एम. -

डॉ. भट्ट जे.एम्. यांनी विनोबांचे शैक्षणिक तत्वज्ञान याबाबत संशोधन केले आहे. संशोधन विषयाचे नांव पुढील प्रमाणे आहे.

" A STUDY OF EDUCATIONAL PHILOSOPHY OF VINOBA BHAVE "[2].

विनोबा भावे यांच्या "शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास " असा संशोधन विषय आहे. हा संशोधन प्रबंध पीएच्.डी. पदवीसाठी सरदार पटेल विद्यापीठास १९७३ मध्ये सादर केला. संशोधन प्रबंध मान्य करून डॉ. भट्ट जे.एम्. यांना पीएच्.डी. ही पदवी मिळाली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१] पूज्य विनोबा भावे यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे पृथ:करण करणे.

२] भारतातील सध्याच्या स्थितीत पूज्य विनोबांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा शिक्षणात कसा वापर करता येईल ते पहाणे.

कार्यवाही :-

संशोधकाने विनोबांची हस्तलिखिते, विनोबांच्या शैक्षणिक तत्वज्ञानावरील इतरांची पुस्तके व विनोबांची विविध पुस्तके यावरून माहिती मिळवली. संशोधकाने विनोबा व गांधीजी यांच्या आश्रमांना भेटी दिल्या. संशोधकाने विनोबांच्या काही सहका-यांच्या मुलाखती घेतल्या

व त्यांच्याशी चर्चा केली. अशा प्रकारे विनोबांचे शैक्षणिक तत्वज्ञान या विषयी माहिती मिळवली. या माहितीचे पृथ:करण करून संशोधकाने निष्कर्ष काढलेले आहेत.

निष्कर्ष :-

१] शिक्षण प्रक्रिया जीवनापुरती मर्यादित न राहता अंतिम ध्येय मिळविण्यासाठीची प्रक्रिया आहे.

२] स्वत:ला ओळखणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे.

३] अभ्यासक्रम हा जीवनाशी निगडीत असला पाहिजे.

४] शिक्षण पध्दतीत शिक्षकांच्या अध्यात्मिक नेतृत्वास महत्वाचे स्थान असले पाहिजे.

स्वत:चा विकास झाल्यास समाजाचा विकास होईल. असे विनोबांचे मत होते. त्यांच्या मते विद्यार्थ्यांमध्ये निर्भयता व शांतता हे गुण असले पाहिजेत. अंतिम ध्येयाच्या बाबत महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्या शैक्षणिक विचारात साम्य दिसून येते. महात्मा गांधी राजकीय स्वातंत्र्याला महत्व देतात, तर विनोबा समाजबांधणीच्या कामाला महत्व देतात.

ब] डॉ. दी. जे. के. -

डॉ. दी. जे. के. यांनी रवींद्रनाथ [redacted] टागोरांच्या कार्याबाबत संशोधन केले आहे. संशोधन विषयाचे नाव पुढील प्रमाणे आहे.

" TAGORES CONTRIBUTION TO EDUCATION FOR INTERNATIONAL UNDERSTANDING"3.

"आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी रवींद्रनाथ टागोरांचे शैक्षणिक योगदान " असा संशोधनाचा विषय आहे. हा संशोधन प्रबंध पीएच्. डी. पदवीसाठी विश्वभारती विद्यापीठास सन १९७२ मध्ये सादर केला. डॉ. दी. जे. के.

यांना विद्यापीठाने पीएच्. डी. ही पदवी प्रदान केली आहे.

युध्दाचे मूळ मानवी मनात आहे, असे टागोरांचे मत होते. त्यामुळे त्यांनी शांतीनिकेतनमध्ये आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा विचार केला. आंतरराष्ट्रीय सामंजस्याची पार्श्वभूमी, पूर्वीची स्थिती व सध्याची स्थिती यांचा विचार या प्रबंधात केला आहे.

रवींद्रनाथांचे मते -

" श्रेष्ठ शिक्षण तेच की जे केवळ माहिती देत नाही, तर आपल्या जीवनाचा संपूर्ण विश्वाशी मेळ घालते "४.

या संशोधनाचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

निष्कर्ष -

१] शांतीनिकेतन व विश्वभारती मधील टागोरांची संकल्पना थोडया फार फरकाने जवळ जवळ २० वर्षांनी जगाने युनेस्को मार्फत स्विकारली.

२] मनुष्याला परस्पराबद्दल विश्वास वाटला तरच परस्परास समजावून घेण्याची वृत्ती वाढेल.

३] विविध प्रकारच्या शैक्षणिक प्रक्रियेमुळे मानवा मानवामधील सहकार्य वृत्ती निश्चित वाढेल.

४] फक्त बौध्दिक शिक्षण दिल्याने व्यक्तिमत्व विकास होत नाही.

५] भावनात्मक विकास, सौंदर्याभिरूची व अध्यात्मिक विकास या गोष्टींचा शिक्षणातून विकास घडवून आणला पाहिजे.

६] सांस्कृतिक सहकार्याची वाढ होण्यासाठी शांतिनिकेतनसारख्या संस्था निर्माण झाल्या पाहिजेत.

क] डॉ. शर्मा बी.डी.

डॉ. शर्मा बी.डी. यांनी शंकराचार्यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन या विषयावर संशोधन केले. त्यांच्या संशोधनाचा विषय पुढील प्रमाणे आहे.

" SHANKARACHARYA KA SHIKSHA DARSHAN ( IN HINDI)"
५.

शंकराचार्यांचा शिक्षणविषयक दृष्टीकोन या विषयावरील संशोधन प्रबंध पीएच्.डी. पदवीसाठी मीरत विद्यापीठास सन १९७८ मध्ये सादर केला. विद्यापीठाने डॉ. शर्मा बी.डी. यांना पीएच्.डी. ही पदवी प्रदान केली आहे. या संशोधनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

उद्दिष्टे :-

१] शंकराचार्यांच्या तत्वज्ञानातून शैक्षणिक तत्वज्ञानाचा शोध घेणे.

२] शंकराचार्यांना अभिप्रेत असणाऱ्या शिक्षण व्यवस्थेचा शोध घेणे.

३] शिक्षणाची ध्येये व अध्यापन पध्दती याबाबत शंकराचार्यांचा दृष्टीकोन अभ्यासणे.

कार्यपध्दती :-

या संशोधनात ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब केला. शंकराचार्यांची भाषणे, इतरांचे शंकराचार्यांवरील लेख व चर्चा यातून संशोधकाने माहिती मिळवली.

निष्कर्ष :-

१] जगतगुरु शंकराचार्य हे धर्मगुरु व तत्वज्ञच नव्हते तर ते तर ते शिक्षणतज्ञही होते.

२] मुक्ती हे शिक्षणाचे मुख्य ध्येय होय.

३] शिक्षणात अध्यात्म व धर्म या बाबी आवश्यक आहेत.

४] शिक्षणाच्या खालील तीन अध्यापन पद्धती शंकराचार्यांनी सांगितल्या आहेत.

अ] गुरुमुखातून ज्ञान ऐकणे.

ब] प्रश्न विचारून ज्ञान मिळविणे.

क] चर्चा करून ज्ञान मिळविणे.

ड] डॉ. आर. ए. कडियाळ -

डॉ. आर. ए. कडियाळ यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यावर संशोधन केले. खालीलप्रमाणे संशोधन विषय होता.

" A CRITICAL STUDY OF THE CONTRIBUTION OF KARMAVEER DR. BHAVURAO PATIL TO THE EDUCATIONAL THOUGHTS, PRACTICES AND DEVELOPMENT OF EDUCATION IN THE STATE OF MAHARASHTRA"[६].

महाराष्ट्र राज्यातील शिक्षण विषयक विचार, शिक्षणाची कार्यवाही व शिक्षणाचा विकास याबाबत कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी दिलेल्या योगदानाचा चिकित्सक अभ्यास. हा संशोधन प्रबंध पीएच्.डी.पदवीसाठी १९७९ मध्ये शिवाजी विद्यापीठात सादर केला होता. डॉ. आर.ए. कडियाळ यांना विद्यापीठाने पीएच्.डी. ही पदवी दिली आहे.

कार्यपद्धती -

हे संशोधन करतांना सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. प्रश्नावली, मुलाखती, विविध शाखांचे अहवाल व शाखांना भेटी यातून माहिती मिळाली आहे.

निष्कर्ष :-

१] शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. तसेच शिक्षण समाजासाठी असले पाहिजे असे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटलांचे मत होते.

२] स्वातंत्र्य व राष्ट्रीय ऐक्य हवे असेल तर बहुजन समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे.

३] शिक्षण सर्वांना मोफत मिळाले पाहिजे.

४] सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी एकच वसतिगृह असले पाहिजे.

५] राष्ट्रीय ऐक्य व ग्रामीण भागाचा विकास शैक्षणिक संस्थानी केला पाहिजे.

६] शिक्षणातून बौध्दिक व नैतिक विकास झाला पाहिजे.

ड] श्री. विलास शंकर पोवार -

श्री. विलास शंकर पोवार यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याबाबत संशोधन केलेले आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय पुढील-प्रमाणे आहे.

" A CRITICAL STUDY OF THE CONTRIBUTION OF RAJARSHI CHHATRAPTI SHAHU MAHARAJA TO THE FIELD OF EDUCATION IN KOLHAPUR STATE" ७.

कोल्हापूर संस्थानात राजर्षि शाहूमहाराजांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास. असा संशोधनाचा विषय होता.

हा संशोधन प्रबंध एम्. फिल्. पदवीसाठी सन १९८६ मध्ये शिवाजी विद्यापीठास सादर केला आहे. श्री. विलास शंकर पोवार यांना शिवाजी विद्यापीठाने एम्. फिल्. ही पदवी दिलेली आहे.

उद्दिष्टे -

१] छत्रपती शाहू महाराजांनी खालील शिक्षणात केलेल्या योगदानाचा शोध घेणे.

अ] प्राथमिक शिक्षण.

ब] माध्यमिक शिक्षण.

क] उच्च शिक्षण.

ड] स्त्री- शिक्षण.

२] छत्रपती शाहू महाराजांनी सुरु केलेल्या वसतिगृह चळवळीचा अभ्यास करणे.

३] छत्रपती शाहू महारांजानी शिक्षणाचा जातीभेद निर्मूलनासाठी कसा वापर केला या बद्दलचा अभ्यास करणे.

कार्यपध्दती -

या संशोधनासाठी ऐतिहासिक पध्दतीचा वापर केला आहे. संशोधकाने प्राथमिक आधार व दुय्यम आधार यांचा वापर केला आहे. छत्रपतीच्या जीवनावरील प्रकाशित साहित्याचा वापर केला आहे. छत्रपती शाहू महारांजानी सुरु केलेल्या विविध संस्थांना भेटी देवून संशोधकाने माहिती मिळवली आहे.

निष्कर्ष :-

१] छत्रपती शाहू महारांजानी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरु केले.

२] प्राथमिक शिक्षण सर्व जातीजमातीसाठी मुक्त केले.

३] शिक्षण-प्रशिक्षणास महत्व दिले.

४] माध्यमिक विद्यालयात शारीरिक शिक्षण सुरु केले.

५] हुषार विद्यार्थ्यांसाठी जातीचा विचार न करता विद्यावेतन दिले.

६] आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांची राहाण्या जेवणाची सोय केली.

७] मुलींना खास शिष्यवृत्या सुरु केल्या.

८] मुलींना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणा-या शिक्षकांना पारितोषिके दिली.

९] संस्कृत शाळा उघडल्या यावरून छत्रपती शाहू महाराजांचे संस्कृत भाषेविषयी प्रेम दिसून येते.

१०] नेतृत्व शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. गांव पाटलांना विशेष प्रशिक्षणाची सोय केली होती.

११] वसतिगृहे काढण्यास आर्थिक मदती केल्या. जातीभेद न पाळणा-या वसतिगृहास महाराज खास अनुदान देत असत.

२.३ <u>संशोधनाची कार्यपध्दती</u> :-

अभ्यासकाने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सध्या शैक्षणिक संशोधनात या पध्दतीचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. संशोधनात या पध्दतीला दुय्यम स्थान आहे. पण व्यवहारात या पध्दतीचा वापर जास्त केला जातो. सर्वेक्षण पध्दतीत वर्तमानावर अधिक भर असतो. सर्वेक्षण करणे म्हणजे निव्वळ माहिती संकलित करणे आणि पत्रके तयार करणे एवढयापुरते मर्यादित नाही. त्यात मापन, वर्गीकरण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष या गोष्टी ~~त्यात~~ येतात.

" सर्वेक्षणाच्या एका टोकाला निव्वळ माहितीचा कोश आहे तर दुस-या टोकाला प्रयोग आहे. त्यामुळे निव्वळ माहिती ~~संकलनाचा~~ संकलनाचा त्यात अंतर्भाव होतो तर प्रयोगशिलतेची व त्यातून अनुमान काढण्याची प्रवृत्तीही त्यांत आढळते" ८.

कै. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या बाबतचा अभ्यासकाचा संशोधन विषय आहे. कर्मवीर डॉ. मामासाहेबांच्या सहवासात राहिलेल्या, त्यांच्या कार्यात मदत केलेल्या व त्यांचे माजी विद्यार्थी असलेल्या खूप व्यक्ती अभ्यासकाला माहिती मिळविण्यासाठी उपलब्ध होऊ शकत होत्या. म्हणून अभ्यासकाने सर्वेक्षण पद्धतीची निवड केली आहे.

अभ्यासकाने प्रश्नावली, मुलाखती, निरीक्षण, प्रकाशित साहित्याचा अभ्यास व उपलब्ध ध्वनीफितीचा वापर या संशोधन साधनांचा वापर केला आहे. प्रश्नावली हे मुख्य संशोधन साधन आहे.

अ] प्रश्नावली :-

सध्या संशोधनात प्रश्नावली या संशोधन साधनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे. प्रश्नावली तयार करणे वाटते तेवढे सोपे नाही अभ्यासकाने संशोधनाच्या उद्दिष्टानुसार प्रश्नावली तयार करून दहा तज्ञ व्यक्तींना भरण्यास दिल्या. नंतर त्यांच्याशी चर्चा करून तयार केलेल्या प्रश्नावलीत आवश्यक ते बदल करून प्रश्नावलीस अंतिम स्वरूप दिले.

साधारणपणे प्रश्नावलीस कमी प्रतिसाद मिळतो.

> " In a mailed questionnaire, the proportion of returns is usually low; it may sometimes be as low as 10% "[९]

पण अभ्यासकास मात्र ~~४७-४%~~ ६२.४% एवढा प्रतिसाद मिळाला आहे.

> " अन्वेषकाला जे प्रत्यक्ष ओळखतात अशा व्यक्तींकडून किंवा संशोधन पुरस्कृत करणा-या संस्थेशी एकनिष्ठतेच्या समान धाग्यांनी बांधलेल्या व्यक्तीकडून मात्र प्रतिचार उत्तम मिळतो व दिलेली माहिती विश्वासार्ह असते. त्यावरून काढलेले निष्कर्ष अधिक वैद्य असतात"[१०].

कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या संबंधात आलेल्या व्यक्ती त्यांच्या संस्थेत काम करणारे कर्मचारी, समाजसेवक व नागरिक यांना अभ्यासकाने प्रश्नावल्या दिल्या अभ्यासकाने ६० प्रश्नावल्या पोष्टाने पाठविल्या व ६५ प्रश्नावल्या प्रत्यक्ष भेटी घेऊन दिल्या. अशा एकूण १२५ प्रश्नावल्या प्रतिसादकास दिल्या. पैकी ७८ प्रश्नावल्या अभ्यासकास मिळाल्या अभ्यासकाने स्मरणपत्रे पाठवून व प्रत्यक्ष संपर्क साधून प्रतिसाद मिळवला. अभ्यासकाने १२५ प्रश्नावलीचे वितरण खालीलप्रमाणे केले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सदस्य | - | २५ |
| २] | समाजसेवक | - | २५ |
| ३] | सर्वसामान्य नागरिक | - | २५ |
| ४] | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळातील कर्मचारी. | - | ५० |
| | एकूण | - | १२५ |

प्रश्नावलीचे स्वरुप :-

प्रतिसादकांची माहिती व उद्दिष्टे यावरुन प्रश्नावलीचे दहा भाग करण्यात आले आहेत. प्रश्नावलीत एकूण प्रश्नसंख्या ४७ आहे. ४७ पैकी बंदीस्त प्रश्न ३९ आहेत. व मुक्त प्रश्न फक्त ८ आहेत. प्रतिसाद चांगला मिळावा म्हणून अभ्यासकाने बंदीस्त प्रश्नांची संख्या जास्त ठेवली आहे. [ पहा परिशिष्ट क्रमांक-२ ]

विभाग अ - या विभागात प्रतिसादकाची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न आहेत. एकूण पाच प्रश्न आहेत.

विभाग ब - कै. कर्मवीर मामासाहेबांचा व प्रतिसादकांचा संबंध यावर या विभागात प्रश्न आहेत. कर्मवीर मामासाहेबांच्या जीवनावर कोणत्या व्यक्ती व पुस्तके यांचा परिणाम झाला याबाबत एकूण ६ प्रश्न आहेत.

विभाग -क -- स्त्री शिक्षणाबाबत मामांचे मत व त्यासाठी त्यांनी केलेले विविध प्रयत्न याबाबत या विभागात एकूण चार प्रश्न आहेत.

विभाग- ड - कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचा विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्याबाबत काय दृष्टीकोन होता आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कोणते प्रयत्न केले याबाबतचे एकूण पाच प्रश्न या विभागात आहेत.

विभाग- इ - वर्णव्यवस्था व अंधश्रध्दा निर्मूलनासाठी केलेले प्रयत्न याबाबत या विभागात प्रश्न आहेत. एकूण तीन प्रश्न आहेत.

विभाग - ई - मामासाहेबांनी सुरु केलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा आहार व व्यायाम याबाबतचे पाच प्रश्न या विभागात आहेत.

विभाग - ए - वसतिगृहातील मुलांमध्ये नेतृत्वगुण व श्रमाची आवड हया गुणांची वाढ व्हावी म्हणून मामासाहेब कोणते प्रयत्न करीत असत याबाबतचे एकूण चार प्रश्न या विभागात आहेत.

विभाग - फ - कर्ज, सुधारित बी-बियाणे व शेतक-यांची आडवणूक या बाबत शेतक-यात जागृती करण्यासाठी मामांचे विविध प्रयत्न याविषयी माहिती देणारे एकूण पाच प्रश्न या विभागात आहेत.

विभाग - म - आर्थिक स्थितीमुळे ज्या मुलांना शिक्षण घेता येत नाही. अशा मुलांसाठी मामांनी काय व्यवस्था केली? अशा मुलांची नावे याबाबत माहिती देणारे चार प्रश्न या विभागात आहेत.

विभाग - म - विविध समाजघटकांत मामाबद्दलची भावना, मामा शिक्षा करीत असत त्याबाबत मत व मामांचे विशिष्ट गुण इत्यादी बाबत माहिती मिळविण्यासाठी या विभागात सहा प्रश्न आहेत.

ब] <u>मुलाखती</u> :-

प्रतिसादकाविषयी प्रत्यक्ष माहिती मिळविण्याचे एक प्रभावी साधन म्हणजे मुलाखती. अभ्यासकाने ~~स्व~~रचित [परिशिष्ट-३ ] मुलाखती या प्रकाराचा वापर केला. या प्रकारात अभ्यासकाजवळ प्रश्न योजना व प्रश्न क्रम निश्चित असतो. अभ्यासक प्रतिसादकास निर्देशित प्रश्न विचारतो व उत्तरासाठी मार्गदर्शन करतो.

कै. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या कार्यात मदत करणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती अभ्यासकाने घेतलेल्या आहेत. अभ्यासकाने मुलाखत अनुसूचि तयार केली होती. ~~कर्रचि~~[परिशिष्ट क्रमांक -३ पहा. ]

अभ्यासकांनी एकूण २० व्यक्तींच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. अभ्यासकाने मुलाखतीच्याच वेळी नोंदी केल्या आहेत. मुलाखती घेतलेल्या व्यक्ती खालीलप्रमाणे होत्या.

| | | |
|---|---|---|
| १] श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सदस्य | - | ५ |
| २] प्राध्यापक - शिक्षक | - | १० |
| ३] प्राचार्य | - | ३ |
| ४] सर्व सामान्य नागरिक | - | २ |
| एकूण | - | २० |

क] प्रकाशित साहित्य. -

अभ्यासकाने कर्मवीर मामासाहेबांच्या जीवनावरील सर्व प्रकाशित साहित्याचा अभ्यास केला आहे. प्रकाशित साहित्य खालीलप्रमाणे.

१] शिंगटे व. न. - तपस्या - श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीच्या नियतकालिक मकरंद तर्फे प्रकाशित १९६८.

२] शिंगटे व. नं. त्यागमूर्ती श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीच्या नियतकालिक मकरंद तर्फे प्रकाशित १९७५.

३] मोरे चंद्रकांत आपले मामासाहेब जगदाळे मयूर प्रकाशन पुणे-२.

४] जगदाळे कुंन्ता संपादिका, कर्मयोगी चित्रवाणी प्रकाशन बार्शी १९७८

५] शिंगटे व. न. संपादक अमृतकुंभ कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जि. उस्मानाबाद १९७७

६] शिंगटे व. न. संपादक, पेरणी प्रकाशक वसंतराव गाडेकर बार्शी १९८०

७] शिंगटे व. न. संपादक, सुवर्णकलस श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी सुवर्णमहोत्सव स्मरणिका १९८५

ड ] शाखांना व संस्थांना भेटी -

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था स्थापन केली. ग्रामीण भागात या संस्थेच्या विविध शाखा सुरु केल्या. ह्यापैकी काही शाखांना भेट देवून अभ्यासकांने माहिती मिळवली आहे. कर्मवीर मामांनी विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी काही वेगळ्या संस्था स्थापन केल्या. [ परिशिष्ट क्रमांक - ७ पहा ]

अशा संस्थानाही अभ्यासकाने भेटी दिल्या व माहिती मिळवली.

इ] ध्वनी फितीचा [टेप] उपयोग - कर्मवीर मामासाहेबांच्या काही भाषणांच्या ध्वनीफिती उपलब्ध आहेत. प्राचार्य द. न. शिंगळे व प्राचार्य सी. एस. मोरे यांनी मामांच्या विविध विषयांवर मुलाखती घेतल्या आहेत. त्यामुळे मुलाखतीही ~~दोन्ही~~ ध्वनी मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत. अभ्यासकाने ध्वनी फिती लक्ष पूर्वक ऐकून माहिती मिळवली आहे.

अशा प्रकारे अभ्यासकाने कर्मवीर डॉ. मामासाहेबांच्या कार्याविषयी माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, प्रकाशित साहित्य, संस्थाना भेटी व ध्वनी फितीचा वापर या साधनांचा वापर केला आहे.

------------

## संदर्भ


१] म. बा. कुंडले : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी श्री विद्या प्रकाशन २५० शनिवार अष्टभुजा रस्ता पुणे-३० दुसरी आवृत्ती १९७५ पृष्ठ - १४३.

२] M. B. Buch : Editor, Second Survey of Research in education (1972-78) Socialy for Educational Research and Development Baroda (India) First Edition-1979 Page No.31.

३] M. B. Buch - : Editor A Survey of Research in Education centre of advanced study in Education Baroda 1974 Page No.31

४] म. बा. कुंडले : शैक्षणित तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी श्री विद्या प्रकाशन २५० शनिवार अष्टभुजा रस्ता पुणे-३० दुसरी आवृत्ती १९७५ पृष्ठ-५८०.

५] M.B. Buch : Editor, Second Survey of Research in Education (1972-78) Socialy for Educational Research and Bevelopment Baroda (India) First Edition-1979 Page No. 7

६] Dr. R.A. Kadiyal : Karmaveer Bhaurao Patil, His Conteibution to Education in Maharashtra Indumati Publication, 299 R.K.Nagar Panchgaon Kolhapur-416007 1987.

७] V.S. Powar : A Critical Study of the Contribution of Rajarshi Chhatrapati Shahu Maharaja to the field of Education in Kolhapur State M.Phil (Education) Disseraation Nov-1986 Page No.7.

८] श. शं. मुळे व वि. तु. उमाठे : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळाकरिता साहित्य प्रसार केंद्र नागपूर -१२ १९७७ पृष्ठ क्रमांक-१११.

९] Wilkinson and Bhaudarkar : Methodology and Techniques of Social Research
Himalaya Publishing House
Ramdoot. Dr. Bhalerao Marg
Girgaon Bombay-400004
1984 Page No- 199.

१०] रा. शं. मुळे व वि. तु. उमाठे : शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे महाराष्ट्र
विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळाकरिता
साहित्य प्रसार केंद्र नागपूर-१२ १९७७
पृष्ठ क्रमांक - २०१.

: : : : : : : : : : :